महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी
नाशिक अंतर्गत एकलव्य निवासी शाळांमध्ये
इ.१ ली ते ५ वी चे वर्ग सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः शाआशा-२०१९/प्र.क्र.४०/का.१३
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: - १८ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना :-

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतुने केंद्र शासनाने नवव्या पंचवार्षिक योजनेत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अन्वये वितरीत होणा-या निधीतून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरावर एकलव्य निवासी शाळा स्थापन करण्याचा निर्णय घेतला. सदर निर्णयानुसार राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात या योजनेअंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सन २०००-२००१ पासून ते सन २०१७-२०१८ पर्यंत १८ एकलव्य निवासी शाळा मंजूर असून त्यापैकी मागील वर्षापर्यंत १६ शाळा सुरु होत्या. मागील वर्षापर्यंत सुरु न झालेलया दोन शाळा व त्यानंतर मंजूर झालेल्या ७ अशा एकूण ९ एकलव्य निवासी शाळा सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून सुरु होत आहेत. या शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड, नवी दिल्ली (CBSE) या अभ्यासक्रमाचे इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्यात येते. सदर शाळांमध्ये नवोदय विद्यालयाप्रमाणे विद्यार्थ्यांना इ. ६वी ते १२ वी पर्यंत शिक्षण देण्यात येते. सदर शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना भोजन, निवास व्यवस्था, अंथरुण-पांघरुण, वहया - पुस्तके, गणवेश, लेखन साहित्य इत्यादी बाबी मोफत पुरविण्यात येतात. पालकांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना पाठविण्याचा वाढता कल लक्षात घेता २५ एकलव्य निवासी शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ५ वी वर्ग राज्य शासनाच्या निधीतून सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने दि.२८.०८.२०१९ रोजी झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

१. परिशिष्ट-१ मध्ये दर्शविण्यात आलेल्या **२५** एकलव्य निवासी शाळांपैकी प्रथम टप्प्यात १६ एकलव्य निवासी शाळामध्ये व व त्यानंतर उर्वरित शाळांमध्ये इ. १ ली ते ५ वी चे वर्ग सुरू करण्यास करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. एकलव्य निवासी शाळेमध्ये इयत्ता १ ली ते ५ वी चे ४० विद्यार्थ्यांच्या दोन वर्ग/तुकड्या सुरु करण्यासाठी खालील आकृतीबंधास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	एका शाळेसाठी आवश्यक संख्या
१	प्राथमिक मुख्याध्यापक	१
२	प्राथमिक शिक्षक	१०
३	अधिक्षक-पुरुष	१
४	अधिक्षक-स्त्री	१
५	काळजीवाहक (स्त्री/पुरूष)	प्रत्येक ३० निवासी विद्यार्थ्यासाठी एक
६	संगणक शिक्षक	१ (मानधनावर)
७	कला शिक्षक	१ (मानधनावर)
८	संगीत शिक्षक	१ (मानधनावर)
९	क्रीडा शिक्षक	१ (मानधनावर)

३. वरील आकृतीबंधानुसार एकलव्य निवासी शाळांसाठी आवश्यक पदे ही बंद अथवा समायोजीत केलेल्या आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर पदे महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी यांचेकडे वर्ग करण्यात यावीत. सद्या कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर पदांपैकी इंग्रजीमध्ये शिकवण्यास पात्र व इच्छूक शिक्षकांना वर्ग करण्यात यावे. तसेच आवश्यकतेनुसार अधीक्षक/अधिक्षिका व वर्ग-४ कर्मचा-यांच्या सेवा सोसायटीकडे वर्ग करण्यात याव्यात. तसेच शासकीय आश्रमशाळाप्रमाणे प्रत्येक शाळेत क्रिडा शिक्षक, संगणक शिक्षक, कला शिक्षक व संगीत शिक्षक ही पदे मानधनावर भरण्यास महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटीला परवानगी देण्यात येत आहे.

४. ग्रामीण भागात इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणारे शिक्षक नियमित वेतनश्रेणीवर उपलब्ध न झाल्यास मानधनावर विहीत पध्दतीने किंवा बाहेरच्या राज्यातील शिक्षक घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी शिक्षक भरतीच्या जाहिरातीस राज्य व राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्राव्दारे व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल. तसेच सदरच्या जाहिराती नामांकित डीएड, बीएड कॉलेज आणि नामवंत राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त शिक्षण संस्था, विद्यापिठे यांच्या पर्यंत पोहचविण्यात येतील. विभागाच्या व क्षेत्रीय स्तरावरील विविध वेबसाईटवर प्रसिध्दी देण्यात येईल. इंग्रजी माध्यमातुन शिक्षण झालेल्या प्राथमिक शिक्षक पदासाठीची पात्रता अर्हताधारण करणा-या उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या नामवंत शिक्षण संस्थाबरोबर सामंजस्य करार करुन गुणवत्ताधारक शिक्षक व शिक्षणतज्ञ यांच्या सेवा व मार्गदर्शन घेण्यात येईल.

५. भविष्यात नव्याने मंजूर होणाऱ्या एकलव्य निवासी शाळांमध्ये इ. १ली ते ५ वी चे वर्ग सुरु करण्याचे व त्यासाठी शासकीय आश्रमशाळेतील अतिरिक्त ठरलेली आवश्यक पदे

महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटीकडे वर्ग करण्याचे अधिकार आदिवासी विकास विभागास राहतील.

६. सुरक्षा व स्वच्छता या सेवा बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी उपरोक्त बाबत वर्ग सुरू करणे संदर्भात आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. उपरोक्त खर्च शासकिय आश्रमशाळांच्या संबंधित अर्थसंकल्पिय लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

८. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५०८/२०१९/व्यय-१४, दिनांक २६.०८.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८१६११०५१२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.09.18 16:18:23 +05'30'

(सु. ना. शिंदे)

उप सचिव ,महाराष्ट्र शासन

सहपत्र:- परिशिष्ट-१.

प्रत:-

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव ,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (आ.वि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. राज्यमंत्री (आ.वि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन मुंबई.
८. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व मा.विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचे मार्फत.
१०.आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
११.अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर
१२.सर्व विभागीय आयुत्त

१३.सर्व जिल्हाधिकारी

१४.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

१५.संचालक, प्राथमिक शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

१६.संचालक, माध्यमिक शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

१७.संचालक, उच्च शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१८. सदस्य सचिव तथा राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,जवाहर बाल भवन, नेताजी सुभाषचंद्र मार्ग,चर्नी रोड , मुंबई.

१९.विभागीय शिक्षण संचालक, नाशिक/पुणे/औरंगाबाद/नागपूर

२०.संचालय, सर्व शिक्षा अभियान संचलनालय, महाराष्ट्र राज्य, चर्नीरोड, मुंबई

२१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १ / २ मुंबई/ नागपूर

२२.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई/ नागपूर

२३.संचालक, लेखा व कोषागरे संचलनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२४.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

२५.सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२६.संबधित शासकीय आश्रमशाळा . (परिशिष्ट “१”) प्रमाणे

परिशिष्ट :- १

अ.क्र.	एकलव्य निवासी शाळेचे नाव	टप्पा
१	पेठरोड, नाशिक	प्रथम
२	कांबळगाव, ता. जि.पालघर	प्रथम
३	चिखलदरा, जि. अमरावती	प्रथम
४	खैरीपरसोडा, ता. रामटेक, जि. नागपूर	प्रथम
५	पिंप्रीसद्रोद्यीन, ता. इगतपूरी, जि. नाशिक	प्रथम
६	नंदुरबार, ता. जि. नंदुरबार	प्रथम
७	बोरगाव, ता.देवरी, जि.गोंदिया	प्रथम
८	तुमरगुंडा (अहेरी), जि. गडचिरोली	प्रथम
९	अजमेर सौंदाणे, ताबागलाण ., जिनाशिक .	प्रथम
१०	मवेशी, ता.अकोले, जि. अहमदनगर	प्रथम
११	शेंडेगाव, ता. शहापूर, जि. ठाणे	प्रथम
१२	सहस्त्रकुंड, ता.किनवट, जि.नांदेड	प्रथम
१३	पिंपळनेर, ता.सार्की, जि.धुळे	प्रथम
१४	देवाडा, ता.राजूरा, जि चंद्रपूर	प्रथम
१५	टिटवे, ता.दिंडोरी, जि.नाशिक	प्रथम
१६	चामोर्शी, जि.गडचिरोली	प्रथम
१७	पांढरकवडा, जि. यवतमाळ	व्दितीय
१८	धडगाव, जि. नंदुरबार	व्दितीय
१९	सवणे, ता.तलासरी, जि. पालघर	व्दितीय
२०	जव्हार, जि. पालघर	व्दितीय
२१	ढोगसांगळी, नवापूर, जि. नंदूरबार	व्दितीय
२२	अक्कलकुवा, जि. नंदूरबार	व्दितीय
२३	चणकापुर, कळवण, जि. नाशिक	व्दितीय
२४	गेवर्धा, कुरखेडा, जि. गडचिरोली	व्दितीय
२५	शिंदेदिगर, ता.सुरगाणा, जि. नाशिक	व्दितीय

****